जलयुक्त शिवार अभियान करीता जिल्हा नियोजन विकास समिती मार्फत व मदत व पुनर्वसन विभागाकडून लेखाशिर्ष ४२५० A०२५ अंतर्गत प्राप्त निधी विशेष बाब म्हणून ३० जून, २०१७ पर्यंत खर्च करण्यास परवानगी देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**ग्रामविकास व जलसंधारण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: जशिअ-२०१७/प्र.क्र. १५५ /जल-७**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक- ३१ मार्च, २०१७

**वाचा:**

१) जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक: जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७ दि. ०५ डिसेंबर २०१४
२) जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक: जलसं-२०१६/प्र.क्र.१९२/जल-७ दि. ३१ मार्च, २०१६, दिनांक २७ ऑक्टोबर, २०१६ व दिनांक १४ मार्च, २०१७.
३) जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक: जशिअ-२०१६/प्र.क्र. ५१८/जल-७, दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६
४) जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक: जशिअ-२०१६/प्र.क्र.५१८/जल-७, दिनांक १४ मार्च, २०१७

**प्रस्तावना-**

टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी राज्यात जलयुक्त शिवार अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाकरीता विविध योजनांमधून निधी उपलब्ध होत आहे.

राज्यात सन २०१६ मध्ये चांगला पाऊस झाला. त्यामुळे ओढे/नाला यामध्ये डिसेंबर पर्यंत पाणी होते. तसेच रब्बी पिके जानेवारी पर्यंत शेतात होती. या सर्व परिस्थितीमुळे नियोजन केलेली कामे विहित वेळेत पूर्ण करता आलेली नाहीत. सबब वितरीत केलेला निधी अखर्चित राहणार आहे. सदर अखर्चित निधी प्रत्यार्पित केला तर हाती घेण्यात आलेली कामे पूर्ण करण्यास अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. सबब जलयुक्त शिवार अभियानाकरीता सन २०१६-१७ जिल्हा नियोजन व विकास समितीमार्फत दिलेला विशेष निधी व मदत व पुनर्वसन विभागाकडून लेखाशिर्ष ४२५० A०२५ अंतर्गंत प्राप्त झालेला रु.८७५ कोटी निधी पैकी दि.३१ मार्च, २०१७ रोजी शिल्लक राहणारा निधी विशेष बाब म्हणून जून २०१७ अखेर पर्यंत खर्च करण्यास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय-**

सर्वांसाठी पाणी टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी राज्यामध्ये सन २०१५-१६ या वर्षापासून जलयुक्त शिवार अभियान हा प्रमुख महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

२. जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत सन २०१६-१७ मध्ये ५२९२ गावांची निवड करण्यात आली असून सदर गावांकरीता नियोजन विभागामार्फत जिल्हा नियोजन व विकास समितीच्या माध्यमातून रु. ६००.०० कोटी विशेष निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. या निधीमधील दि. ३१ मार्च, २०१७ अखेर अखर्चित राहणारा सर्व निधी अर्थसंकल्पीय प्रणालीवरुन काढून ३० जून २०१७ पर्यंत खर्च करण्यास एक विशेष बाब म्हणून शासन मान्यता देण्यात येत आहे.

३. कृती आराखडयानुसार कामे पूर्ण करण्याकरीता निधी कमी पडत असल्याने मदत व पुनर्वसन विभागाकडून (४२५०-A०२५) या लेखाशिर्षाखाली उपलब्ध झालेल्या निधीतून शासन निर्णय दि. १३ ऑक्टोबर, २०१६ अन्वये रु. ८०० .०० कोटी निधी व शासन निर्णय दि. १४ मार्च, २०१७ अन्वये रु. ७५.०० कोटी असा एकूण रु. ८७५.०० कोटी निधी वितरीत करण्यात आलेला आहे. या निधीमधील अखर्चित असलेल्या निधीपैकी २५ टक्के निधी अर्थसंकल्पीय प्रणालीवरुन काढून दिनांक ३० जून २०१७ पर्यंत खर्च करण्यास एक विशेष बाब म्हणून शासन मान्यता देण्यात येत आहे. व उर्वरीत निधी समर्पित करण्यात यावा.

४. जलयुक्त शिवार अभियान सन २०१५-१६ मधील काढून ठेवलेल्या निधीपैकी दिनांक ३१ मार्च २०१७ अखेर अखर्चित राहणारा निधी समर्पित करावा. सर्व रक्कम समर्पित केल्याबाबत जिल्हाधिकारी यांनी प्रमाणपत्र शासनास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

५. सर्व जिल्हाधिकारी यांनी परिच्छेद २ व ३ प्रमाणे मान्यता दिल्यानूसार अनुदानाची रक्कम आहरीत करुन संबंधित जिल्हा परिषदेकडे सुपूर्द करावी. जिल्हा परिषदेने सदरच्या रक्कमेचे वितरण जिल्हाधिकारी यांच्या निदेशानुसार संबंधित अंमलबजाणी यंत्रणेस करावे.सदरच्या अनुदानाची रक्कम ३० जून, २०१७ पर्यंत करणे बंधनकारक आहे.

६. सदर शासन निर्णय वित्त विभाग यांच्या सहमतीने त्या विभागाचे अनौपचारीक संदर्भ क्र.अनौ.स.क्र.२३२/२०१७/व्यय-१५ दिनांक ३१/३/२०१७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून असून त्याचा संकेतांक २०१७०३३११०५७३७२४२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या निदेशानुसार व नावाने.

Narayan Karad

Digitally signed by Narayan Karad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=ae7faeabaf4571c2748e4dd5ffd2cd108de0e130859970f4d7d0ee40046b3e9e, cn=Narayan Karad
Date: 2017.03.31 15:14:06 +05'30'

**( ना.श्री.कराड )**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा. मंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव,
२) मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
३) प्रधान सचिव (जलसंधारण) यांचे स्वीय सहायक,
४) सर्व विभागीय आयुक्त
५) आयुक्त कृषी महाराष्ट्र राज्य
६) महालेखापाल १ मुंबई, महालेखापाल २ नागपूर
७) संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन पुणे
८) सर्व जिल्हाधिकारी
९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१०) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी
११) मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) पुणे
१२) मुख्य अभियंता, विदर्भ सदन सिंचन विकास कार्यक्रम नागपूर
१३) सर्व अधिक्षक अभियंता लघुसिंचन जलसंधारण
१४) सर्व विभागीय कृषि सहसंचालक
१५) सर्व कार्यकारी अभियंता लघुसिंचन जलसंधारण
१६) सर्व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी
१७) निवडनस्ती.